SAMPLE CONTENT

PERFECT

# मराठी बालभारती

इयत्ता
## आठवी
(मराठी माध्यम)



सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित अद्ययावत अभ्यासक्रमावर आधारित.

PERFECT

# मराठी बालभारती

## इयत्ता आठवी (मराठी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- इयत्ता १० वीचे अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूप केंद्रस्थानी ठेवून रचना.
- सहज, सोपी लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- पाठांचे परिच्छेदांमध्ये विभाजन.
- पाठाखालील सर्व प्रश्नांचा समर्पक उत्तरांसहित समावेश.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- व्याकरणाच्या अधिकाधिक सरावाकरता प्रत्येक पाठ व कवितेच्या अंती भाषाभ्यास विभाग अंतर्भूत.
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- उपयोजित लेखनावर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव.
- स्वयंअध्ययनासाठी परिपूर्ण मार्गदर्शक.
- Q.R. Code मार्फत आवश्यक तेथे शोध घेऊया, चर्चा करूया, उपक्रम, प्रकल्प, माझे वाचन इत्यादी कृतींची उत्तरे समाविष्ट.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 9488

TEID: 3220

# प्रस्तावना

आठवीचे वर्ष म्हणजे दहावीच्या महत्त्वाच्या वळणाच्या जवळ पोहोचवणारा महत्त्वाचा टप्पा. या वर्गाकरता शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनाधारित अभ्यासक्रम भाषेची रुची वाढवणारा व अभ्यासाची कला शिकवणारा आहे. 'घोका आणि ओका' या पाठांतर पद्धतीपेक्षा वेगळा असा हा अभ्यासक्रम भाषिक कौशल्यांचा विकास करणारा आहे, यामुळे भाषाज्ञान हे फक्त प्रश्नोत्तरांपुरते मर्यादित न राहता आकलनशक्ती व सर्जनशीलता या क्षमतांचा विकास करणारे ठरेल. या अभ्यासक्रमाशी ओळख करून देण्यासाठी आणि हसतखेळत भाषा आत्मसात करण्यासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे PERFECT मराठी बालभारती : इयत्ता आठवी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

इयत्ता दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाला आधारभूत मानून या पुस्तकाची निर्मिती केली आहे. दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा व त्या दृष्टीने अध्ययन करणे सोपे व्हावे हा यामागील मूळ उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन यांसारखी भाषिक कौशल्ये विकसित करणे तसेच वैचारिकता व कल्पनाशक्ती विकसित करणे ही या पुस्तकाची उद्दिष्टे आहेत. पुस्तकाची सहज, सुलभ, सोपी भाषा ही मुलांना भाषेत जाणवणारी क्लिष्टता दूर करून त्यांच्यामध्ये विषयाची आवड निर्माण करण्यास सक्षम आहे.

परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार करता अधिकाधिक सरावासाठी मुबलक कृतींची सोप्या शब्दांत रचना केली आहे. व्याकरण हा भाषेचा आत्मा असतो हे जाणून व्याकरणाच्या सरावावर अधिकाधिक भर देण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना व्याकरणावर पर्यायाने भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे होईल. हे पुस्तक मुलांची परीक्षेच्या दृष्टीने प्रत्येक गरज भागवण्यास समर्थ आहेच शिवाय ते विद्यार्थ्यांमध्ये भाषेकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन निर्माण करणारेही आहे.

या पुस्तकाचे अंतरंग अधिक सुंदर आणि ज्ञानाशयाने समृद्ध असून एका दृष्टिक्षेपात ते जाणता यावे याकरता पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये पुढे देण्यात आली आहेत.

या पुस्तकात प्रत्येक अभ्यासघटकाचा सर्वांगाने परामर्श घेतला आहे. तेव्हा विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक एक परिपूर्ण मार्गदर्शक ठरेल अशी आम्हांला खात्री वाटते. भरपूर सराव, सुटसुटीत मांडणी, आत्मसात करण्यास सोपी व ओघवती लेखनशैली यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास आहे.

प्रयत्नांती परमेश्वर. चला, नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया. परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया. तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबत आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय **support@lazybone.in** या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** द्वितीय

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी बालभारती; चौथे पुनर्मुद्रण २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

# ठळक वैशिष्ट्ये

### दहावीच्या कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित

विद्यार्थ्यांना दहावीच्या अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाचा परिचय व्हावा व त्या दृष्टीने अध्ययन करण्याचा सराव व्हावा याकरता दहावीच्या कृतिपत्रिका प्रारूपाच्या आधारे या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे.

### कवितेचा भावार्थ

कविता समजण्यास सोपी व्हावी याकरता संपूर्ण कवितेचा भावार्थ सहजसोप्या शब्दांत देण्यात आला आहे.

### शब्दार्थ / वाक्प्रचार

पाठ उत्तमप्रकारे समजण्याकरता त्यातील अवघड शब्दांचे व वाक्प्रचारांचे सोप्या मराठीत अर्थ देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीकरता वर्णमालेच्या क्रमानुसार त्यांची रचना करण्यात आली आहे.

### टिपा

पाठ चांगल्याप्रकारे समजण्याकरता पाठात आलेल्या अवघड संकल्पना स्पष्ट करणाऱ्या टिपा वर्णमालेच्या क्रमानुसार देण्यात आल्या आहेत.

### पाठांचे परिच्छेदांत विभाजन

नवीन अभ्यासक्रमाचे स्वरूप तसेच दहावीचे अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूप लक्षात घेऊन सर्व पाठांचे परिच्छेदांत विभाजन केले आहे.

### पाठाधारित कृती / कवितेवर आधारित कृती

या विभागात संपूर्ण पाठावर/ कवितेवर आधारित असलेल्या कृतींचा समावेश करण्यात आला आहे. या कृतीतील उत्तरे संपूर्ण पाठाचा आढावा घेऊन लिहिली गेली आहेत.

### भाषाभ्यास विभाग

भाषाभ्यासाच्या अधिक सरावाकरता प्रत्येक पाठाच्या व कवितेच्या शेवटी व्याकरण व भाषिक घटकांवर आधारित भरपूर कृतींचा समावेश असलेला भाषाभ्यास विभाग देण्यात आला आहे.

### स्वतंत्र व्याकरण विभाग

विद्यार्थ्यांना व्याकरणिक घटकांची सविस्तर माहिती व्हावी व संकल्पनांचा सखोल अभ्यास व्हावा याकरता स्वतंत्र व्याकरण विभागाचा समावेश करण्यात आला आहे.

### स्वतंत्र उपयोजित लेखन विभाग

विद्यार्थ्यांची लेखनकौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टीने सर्व लेखनप्रकारांच्या वैविध्यपूर्ण कृती असणारा उपयोजित लेखन विभाग देण्यात आला आहे.

### Q. R. Code

विद्यार्थ्यांचे शब्दज्ञान वाढीस लागावे या दृष्टीने आवश्यक तेथे चर्चा करूया, शोध घेऊया, लिहिते होऊया, उपक्रम, प्रकल्प इत्यादी Q. R. Code च्या माध्यमातून देण्यात आले आहेत.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठ | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **भाग – १** | | |
| १. | भारत देश महान (गीत) | माधव विचारे | १ |
| २. | माझ्या देशावर माझे प्रेम आहे | यदुनाथ थत्ते | २ |
| ३. | लाखाच्या ... कोटीच्या गप्पा | वसंत जोशी | ११ |
| ४. | नव्या युगाचे गाणे (कविता) | वि. भा. नेमाडे | १९ |
| ५. | सुरांची जादूगिरी | डॉ.द.ता.भोसले | २५ |
| | **भाग – २** | | |
| ६. | असा रंगारी श्रावण (कविता) | ऐश्वर्य पाटेकर | ३४ |
| ७. | अण्णा भाऊंची भेट | विठ्ठल उमप | ४० |
| ८. | धाडसी कॅप्टन : राधिका मेनन | मच्छिंद्र ऐनापुरे | ४८ |
| ९. | विद्याप्रशंसा (कविता) | कृष्णशास्त्री चिपळूणकर | ५६ |
| १०. | लिओनार्दो दा व्हिंची (स्थूलवाचन) | अच्युत गोडबोले, दीपा देशमुख | ६१ |
| | **भाग – ३** | | |
| ११. | स्वामी विवेकानंदांची भारतयात्रा | सुनील चिंचोलकर | ६६ |
| १२. | गोधडी (कविता) | डॉ. कैलास दौंड | ७५ |
| १३. | पाड्यावरचा चहा | गोदावरी परुळेकर | ८१ |
| १४. | फुलपाखरे | वि.पां.दांडेकर | ९२ |
| १५. | आळाशी (कविता) | हनुमंत चांदगुडे | ९८ |
| | **भाग – ४** | | |
| १६. | चोच आणि चारा | मकरंद जोशी | १०४ |
| १७. | अन्नजाल (कविता) | हर्ष सदाशिव परचुरे | ११३ |
| १८. | जलदिंडी | डॉ. विश्वास येवले | ११९ |

| क्र. | पाठ | | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १९. | गे मायभू | | सुरेश भट | १२८ |
| २०. | शब्दकोश (स्थूलवाचन) | | | १३३ |
| २१. | संतवाणी | (अ) | संत तुकाराम | १३७ |
| | | (आ) | संत सावता माळी | १४१ |
| | **व्याकरण विभाग** | | | |
| १. | सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय | | | १४५ - १७० |
| २. | प्रयोग | | | |
| ३. | संधी | | | |
| ४. | अलंकार | | | |
| ५. | समास | | | |
| ६. | वृत्त | | | |
| ७. | शब्दांच्या जाती | | | |
| ८. | वाक्यांचे प्रकार | | | |
| ९. | काळ | | | |
| १०. | लेखननियम | | | |
| ११. | विरामचिन्हे | | | |
| १२. | आलंकारिक शब्द | | | |
| १३. | म्हणी | | | |
| | **उपयोजित लेखन विभाग** | | | |
| १. | पत्रलेखन | | | १७१ |
| २. | सारांशलेखन | | | १७५ |
| ३. | संवादलेखन | | | १७७ |
| ४. | गद्यआकलन | | | १७९ |
| ५. | बातमीलेखन | | | १८२ |
| ६. | जाहिरातलेखन | | | १८५ |
| ७. | सूचनाफलक | | | १८८ |
| ८. | निबंधलेखन | | | १९० |


**[टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**


व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन विभागांत अधिक गुण मिळवायचे असल्यास **"मराठी व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन"** या पुस्तकाद्वारे सराव करा. या पुस्तकाच्या अधिक माहितीसाठी दिलेला Q. R. Code स्कॅन करा.

Sample Content

Page no. **1** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# २ माझ्या देशावर माझे प्रेम आहे

– यदुनाथ थत्ते

## पाठाची पार्श्वभूमी

पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञेच्या तिसऱ्या वाक्याचा उलगडलेला आशय म्हणजे 'माझ्या देशावर माझे प्रेम आहे' हा पाठ होय. काया, वाचा, मनाने केलेला संकल्प म्हणजे प्रतिज्ञा होय. प्रतिज्ञेतील शब्द म्हणजे केवळ शब्द नसून त्यामागे एक दृढ संकल्प असतो, काहीतरी करण्याचा ठाम विश्वास असतो. विद्यार्थी आणि लेखकाच्या संवादरूपातील हा पाठ प्रतिज्ञेचा अर्थ अगदी सहजपणे वाचकाच्या मानत रुजवतो.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अध्यापक | शिक्षक, गुरू |
| अपार | अमर्याद |
| अपूर्व | पूर्वी कधीही न घडलेले |
| अलबत | नक्कीच |
| आपत्काळी | संकटकाळी |
| आस्था | कळकळ, काळजी |
| उघडेबोडके | उजाड, झाडं-पानं नसलेले |
| उपासक | उपासना, पूजा करणारा |
| करंटे | दुर्दैवी |
| गुणवत्ता | दर्जा |
| गुलाम | नोकर |
| गौरव | सन्मान |
| घोषवणे | गजर करणे |
| ढोंग | नाटक |
| दावा | हक्क |
| निवडणूक | मतदारांनी उमेदवार निवडून देण्याची प्रक्रिया |
| निष्क्रिय | कोणतीही क्रिया न करणारा |
| नि:स्वार्थी | स्वत:च्या स्वार्थाचा विचार न करणारा |
| परतणे | परत येणे |
| फोल | निष्फळ, व्यर्थ, निरुपयोगी |
| भूमिपुत्र | मूळचे रहिवासी |
| भेद | फरक |
| यच्चयावत | सगळे, सर्व |
| रुचणे | आवडणे, पटणे |
| वास्तवात | प्रत्यक्षात, सत्यात |
| विणकर | विणकाम करणारा |
| वंश | कुळ |
| शेले | अंगावर घ्यावयाचे उंची वस्त्र |
| सक्रिय | क्रियाशील |
| सणंग | सलग विणलेले अखंड वस्त्र |
| सस्यश्यामल | बहरलेल्या पिकांनी समृद्ध |
| सज्ञान | शहाणा, जाणता |
| सुखावणे | समाधानी होणे |
| सुजलाम | पाण्याने परिपूर्ण |
| सुबुद्ध | हुशार, बुद्धिमान, शहाणा |
| सुफलाम | फळांनी बहरलेली |
| स्वार्थी | स्वत:चा विचार करणारा |
| संवर्धक | चांगली वाढ करणारे, उत्तम पोषण करणारे |
| हमी | खात्री |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| आलिंगन देणे. | मिठी मारणे, गळाभेट घेणे. |
| आश्वासन देणे. | हमी देणे, खात्री देणे. |
| कचाट्यात सापडणे. | तावडीत सापडणे. |
| कवेत घेणे. | कुशीत घेणे. |
| कंबर कसणे. | काम करायला तयार होणे. |
| खटपट करणे. | प्रयत्न करणे. |
| गगनभेदी घोष करणे | मोठ्या आवाजात घोषणा देणे / गजर करणे. |
| घाम गाळणे. | कष्ट करणे, मेहनत करणे. |
| पोटापलीकडे पाहणे. | स्वार्थ सोडून व्यापक दृष्टीने विचार करणे. |
| प्रकट करणे. | व्यक्त करणे. |
| फळ मिळणे. | यश मिळणे. |
| रचनात्मक काम करणे. | नियोजनबद्ध काम करणे. |
| शब्दांकित करणे. | शब्दांत व्यक्त करणे. |
| संकटांना आमंत्रण देणे. | संकट स्वत:वर ओढवून घेणे. |

Sample Content

## टिपा

| | |
|---|---|
| कुरबान हुसेन | सोलापुरातील स्वातंत्र्यचळवळीतील पत्रकार असून इंग्रजांनी स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाबद्दल दोषी ठरवून त्यांना फासावर चढवले होते. |
| खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे | हे साने गुरुजींनी लिहिलेले गीत असून या गीतातून त्यांनी प्रेमाचे, वात्सल्याचे, दयेचे महत्त्व विशद केले आहे. मानवा-मानवांत कोणताही भेद नसून, मानवाचा खरा धर्म हा प्रेम करणे आहे हे त्यांनी यातून पटवून दिले. |
| जागतिक भाषा | संपूर्ण जग जाणत असलेली, बोलत असलेली भाषा. ही भाषा हास्य आणि अश्रूंच्या रूपातील भावनांची भाषा आहे असे म्हणता येईल. |
| पंडित जवाहरलाल नेहरू | हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर नेते असून ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान व आंतरराष्ट्रीय दर्जाचे श्रेष्ठ मुत्सद्दी होते. |
| भगतसिंग | भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील एक थोर सशस्त्र क्रांतिकारक. आपल्या कर्तव्यनिष्ठेने, त्यागाने, नेतृत्वाने, धाडसाने आणि प्राणांच्या आहुतीने ऐन तारुण्यात सबंध देशात चैतन्य निर्माण करणारा देशप्रेमी. इंग्रजांविरुद्धच्या धाडसी कारवायांमुळे यांना सुळावर चढवण्यात आले. |
| राजगुरू | भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील एक सशस्त्र क्रांतिकारक. लाला लजपतराय या थोर नेत्याच्या मृत्यूचा बदला घेण्याकरिता भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांच्या सोबतीने कार्य करणारा क्रांतिकारक. इंग्रजांविरुद्धच्या धाडसी कारवायांमुळे यांना सुळावर चढवण्यात आले. |
| संत कबीर | हे उत्तर भारतातील प्रख्यात कवी असून आपल्या अनुभवातील ज्ञानाला त्यांनी सर्वाधिक महत्त्व दिले आहे. त्यांनी समाजातील भेदांना पूर्णपणे पुसून टाकत भक्तिमार्ग व योगमार्गाचा पुरस्कार केला. आपल्या दोह्यांमधून त्यांनी समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. |
| साने गुरुजी | अध्यापक, स्वातंत्र्य सैनिक, साहित्यिक, पत्रकार, समाजसेवक, लोकशाही समाजवादाचे भाष्यकार आणि आंतर-भारती चळवळीचे प्रवर्तक असा दीर्घ परिचय असलेले पांडुरंग सदाशिव साने म्हणजेच साने गुरुजी होय. |

## संकलित मूल्यमापन

### परिच्छेद १

### कृती १ – आकलन

**१. आकृत्या पूर्ण करा.**

i. **देशावर प्रेम करायचे म्हटले तर या दोघांवरही प्रेम हवे** → ☐ ☐

**उत्तर:** १. भूमी २. भूमिपुत्र

ii. **आई प्रेम करते म्हणजे** → ☐ ☐

**उत्तर:** १. आपल्या मुलांचे पालनपोषण करते
२. त्यांना वाढवते

iii. **देशावर प्रेम करायचे म्हणजे** → ☐ ☐

**उत्तर:** १. देशाचे पालनपोषण करायचे
२. देशाचा गौरव वाढवायचा

**२. चौकटी पूर्ण करा.**

i. **लेखक शाळेत गेले ती वेळ** → ☐

ii. **मुलांशी संवाद साधणारे** → ☐

iii. **देश म्हणजे** → ☐

**उत्तर:** i. प्रार्थनेची ii. लेखक
iii. देशातील सर्व लोक

**[मी एकदा एका ......................**
**.................................. मुले म्हणाली.]**

(**टीप:** परिच्छेदावर आधारित कृतींकरिता संपूर्ण परिच्छेद न देता केवळ परिच्छेदाची सुरुवात व शेवट यांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील परिच्छेद वाचून कृतींचा अभ्यास करावा.)

Sample Content

### कृती २ – आकलन

**१. चुकीचे विधान शोधा.**

अ. लेखक शाळेत गेले तेव्हा मुले प्रार्थनेहून परतत होती.

ब. देशबांधवांवर प्रेम करणे एक वेळ सोपे; पण देशावर करणे अवघड.

क. काही लोक नुसते भूमीवर प्रेम करतात आणि काही लोक नुसते भूमिपुत्रांवर प्रेम करतात.

ड. परिच्छेदातील संवाद लेखक आणि विद्यार्थी यांमध्ये घडला आहे.

**उत्तर:** देशबांधवांवर प्रेम करणे एक वेळ सोपे; पण देशावर करणे अवघड.

**२. खालील अर्थाची ओळ शोधा.**

**देशाबद्दल प्रेम न बाळगणारे दुर्दैवी आम्ही मुळीच नाही.**

**उत्तर:** "आपल्या देशावर प्रेम न करणारे आम्ही करंटे थोडेच आहोत !"

**३. का ते लिहा.**

**i. लेखक शाळेत गेले असता सुखावले.**

**उत्तर:** लेखक शाळेत गेले असता त्यांनी मुलांना पुस्तकातील प्रतिज्ञा म्हणताना पाहिले, त्यामुळे ते सुखावले.

**ii. मुले आश्चर्याने लेखकाकडे पाहत राहिली.**

**उत्तर:** विद्यार्थ्यांना तुम्ही देशावर प्रेम करता म्हणजे काय करता? असा कोणीही न विचारलेला प्रश्न लेखकाने त्यांना विचारल्याने मुले आश्चर्याने लेखकाकडे पाहत राहिली.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

***१. तुमच्या शब्दांत उत्तर लिहा.**

**तुमच्या आईचे तुमच्यावरील प्रेम व्यक्त करणारा एखादा प्रसंग थोडक्यात लिहा.**

**उत्तर:** मी पाचव्या इयत्तेत असताना आमच्या परिसरात पावसाने कहर मांडला होता. मी त्यावेळी शाळेत होते. पाण्याची वाढती पातळी पाहून शाळेतून मुलांना घरी पाठवण्यासाठी पालकांना बोलवले होते. माझे घर आणि शाळा यांच्यामध्ये एक ओढा होता. पावसामुळे त्याला प्रचंड पाणी आले होते. माझ्या शाळेतील माझे सर्व मित्र घरी निघून गेले होते. बाबा कामाच्या ठिकाणी अडकले होते. मला घेऊन जाण्यासाठी घरातून निघालेली आई मात्र अजून आली नव्हती; पण काही वेळातच मला पूर्ण भिजलेली, घाबरीघुबरी झालेली आई माझ्या दिशेने येताना दिसली. चिखलाने माखलेली, डोळ्यांत अश्रूंच्या धारा लागलेल्या आईला मला पाहताच हायसे वाटले. तिने मला कवेत घेतले आणि ती रडू लागली. माझ्या काळजीने ती त्या ओढ्याच्या कंबरेपर्यंत वाढलेल्या पाण्यातून वाट काढत आली होती. आपल्या मुलीच्या काळजीने तिने त्या पाण्याच्या प्रवाहाचाही विचार केला नाही. आईचे प्रेम हीच या धाडसामागची प्रेरणा होती.

## परिच्छेद २

### कृती १ – आकलन

**१. खालील आकृत्या पूर्ण करा.**

***i.** **'भारतमाता की जय' मधील भारतमाता म्हणजे** → ☐

**उत्तर:** भारतातले सर्व लोक

**ii.** **देशावर प्रेम करायचे म्हटले तर यांतील भेद विसरावे** → ☐ ☐ ☐ ☐

**उत्तर:** १. जात २. धर्म ३. वंश ४. भाषा

**iii.** **दुसऱ्याचे दुःख पाहून** – **प्रेम करायचे म्हणजे** – **दुसऱ्याचा आनंद पाहून**

↓ १ ↓ २

**उत्तर:** १. ओल्या डोळ्यांनी त्याच्या मदतीसाठी धावून जायचे

२. आपणही आनंदी व्हायचे

**iv.** ☐ ← **प्रेम करण्यासाठी यांची भाषा अवगत असावी लागते** → ☐

**उत्तर:** १. अश्रू २. हास्य

***v.** ☐ ← **महात्मा गांधींनी सांगितलेली प्रेमाची दोन वैशिष्ट्ये** → ☐

**उत्तर:** १. प्रेम सक्रिय पाहिजे २. प्रेम सुबुद्ध हवे

***२. खालील विचार कोणाचे आहेत ते लिहा.**

| क्र. | विचार | व्यक्ती |
|---|---|---|
| i. | 'भारतमाता' म्हणजे भारतातले सर्व लोक. | ________ |
| ii. | 'प्रेम निष्क्रिय असूच शकत नाही.' | ________ |

**उत्तर:** i. पंडित जवाहरलाल नेहरू ii. महात्मा गांधी

**[एक मुलगा म्हणाला ....................**
**................................ तसे सुबुद्धही हवे. "]**

### कृती २ – आकलन

**१. योग्य विधान शोधा.**

अ. आपले देशावर असलेले प्रेम आपत्काळी असावे.

ब. गांधीजी लोकांना 'भारत माता की जय' म्हणजे काय ते विचारू लागले.

Sample Content

क. आपल्याला प्रेम दाखवायला संधी मिळावी, म्हणून संकटांना आमंत्रण द्यायचे असते.

ड. भगतसिंह, राजगुरू इत्यादींचे देशावर खरेखुरे प्रेम होते.

**उत्तर:** भगतसिंग, राजगुरू इत्यादींचे देशावर खरेखुरे प्रेम होते.

**२. हे केव्हा घडले ते लिहा.**
**लोकांनी पंडित जवाहरलाल नेहरूंची गाडी अडवली, जेव्हा...**

**उत्तर:** पंडित जवाहरलाल नेहरू निवडणुकीच्या दौऱ्यावर होते.

**३. 'जागतिक भाषा' ही संकल्पना तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**उत्तर:** लेखकाच्या मते हास्य आणि अश्रू यांची भाषा ही 'जागतिक भाषा' आहे. संपूर्ण जगभरात बोलल्या जाणाऱ्या, जगातील प्रत्येक माणसाला समजणाऱ्या अशा या भावनांच्या भाषेला प्रांतांचा, धर्म, पंथांचा अडसर नाही. ती मनाने समजून घ्यायची भाषा आहे. त्यामुळे, ती विशिष्ट प्रदेशापुरती विशिष्ट देशापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण जगाची भाषा आहे.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**१. अश्रू आणि हास्य यांची भाषा ही जागतिक भाषा आहे, याचा अनुभव तुम्ही घेतला आहे का?**

**उत्तर:** हो. मागील वर्षी मुंबईतील मोठ्या बाजारामध्ये मला एक परदेशी मुलगा दिसला. त्या गर्दीत भांबावलेला तो मुलगा रडत होता. त्याचे अश्रू त्याच्या मनातील भीती दाखवून देत होते. नक्कीच काहीतरी झाले असावे असे मला जाणवले. मी माझ्या पालकांच्या मदतीने त्या मुलाची विचारपूस केली; पण भाषा कळत नसल्याने थोडा अडसर जाणवला; मात्र त्याचे न थांबणारे अश्रू तो गर्दीत हरवला असल्याची साक्ष देत होते. आम्ही तत्काळ पोलिसांची मदत घेत त्याच्या आई-वडिलांशी त्याची गाठ घालून दिली. त्याच्या आणि त्याच्या आई व वडिलांच्या चेहऱ्यावरील हास्याने त्यांच्या साऱ्या भावना स्पष्ट झाल्या. हे हास्य आम्हांला विलक्षण समाधान देऊन गेले. भाषा वेगवेगळ्या असल्या तरी हास्य आणि अश्रूंच्या भाषेने या मर्यादा तोडल्या होत्या.

## परिच्छेद ३

### कृती १ – आकलन

**१. आकृती पूर्ण करा.**

☐ ← **देशावर प्रेम करणे म्हणजे** → ☐

**उत्तर:** १. देशाच्या नवनिर्माणासाठी रचनात्मक काम करणे

२. हातात झाडू घेऊन गावाची शास्त्रीय पद्धतीने साफसफाई करणे

**२. चौकटी पूर्ण करा.**

i. **एखाद्या गोष्टीला लहान किंवा मोठे बनवणारा** → ☐

ii. **या वृत्तीने केलेले मोठे कामही लहान असते** → ☐

iii. **या वृत्तीने केलेले लहान कामही मोठे असते** → ☐

**उत्तर:** i. कामाचा संदर्भ

ii. स्वार्थी वृत्ती

iii. नि:स्वार्थी वृत्ती

**३. कोण ते लिहा.**

i. देशासाठी सणंग विणतो आहे अशा भावनेने शेले विणणारे-

ii. पदार्थामध्ये प्रेमाची चव मिसळणारी -

**उत्तर:** i. संत कबीर ii. आई

**["पण शांततेच्या काळात ......................**
**.................................. निर्माण करत असतो.]**

### कृती २ – आकलन

**१. परिच्छेदात तुलना केलेल्या बाबींचा तक्ता पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| शिकवणे | | |
| पदार्थ | | |
| शाबासकी | | |

**उत्तर:**

| | | |
|---|---|---|
| शिकवणे | परीक्षेत चांगले गुण मिळावेत म्हणून शिकवणे | मुले सज्ञान व्हावीत म्हणून शिकवणे |
| पदार्थ | हॉटेलात बनवलेले पदार्थ | आईने बनवलेले पदार्थ |
| शाबासकी | यंत्राने विशिष्ट वजनाच्या हाताने विशिष्ट गतीने पाठीवर धपधप करणे | आईने दिलेली शाबासकी |

**२. हे केव्हा घडेल ते लिहा.**
**आपण केलेल्या कार्याची गुणवत्ता निश्चितच वेगळी असेल, जेव्हा .....**

**उत्तर:** ते कार्य आपण देशाच्या व देशबांधवांच्या प्रेमाने करू.

**३. परिणाम लिहा.**
**देशाच्या व देशबांधवांच्या प्रेमाने केलेल्या कार्याची गुणवत्ता निश्चितच वेगळी असेल, याची जाणीव नसल्यास.**

**परिणाम:** अनेक अडचणी आणि गैरसोई आपण निर्माण करू.

Sample Content

**४. कारण लिहा.**
**संत कबीर यांचे शेले विणायचे काम अपूर्व असायचे, कारण ...**

**उत्तर:** संत कबीर इतर विणकरांसारखेच शेले विणायचे; मात्र देशासाठी हे सणंग विणतो आहे अशा भावनेने ते शेले विणत असत.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**१. 'पोटापलीकडे पाहायला शिकल्याखेरीज माझ्या देशावर माझे प्रेम आहे असे आपल्याला म्हणताच येणार नाही' या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

**उत्तर:** 'पोटापलीकडे पाहायला शिकल्याखेरीज माझ्या देशावर माझे प्रेम आहे असे आपल्याला म्हणताच येणार नाही' हे वाक्य देशप्रेमाची परिभाषा सांगणारे आहे. मानवाने स्वार्थाचा त्याग करून देशाचा, देशाच्या हिताचा विचार करणे इथे अभिप्रेत आहे. आपले सुख, आपली सुरक्षा, आपले जीवन, आपला फायदा या सर्व गोष्टी वेगळ्या ठेवून समाजाचा फायदा हा विचार जेव्हा आपण करू तेव्हाच हे शक्य होईल. देशातील प्रत्येक व्यक्ती मिळून देश बनतो. त्यामुळे, या प्रत्येक व्यक्तीवर प्रेम करणे त्या प्रत्येक व्यक्तीची काळजी करणे म्हणजेच देशप्रेम असते. आपली कृती आपल्या देशासाठी लाभदायक आहे, की नाही याचा विचार जेव्हा प्रथम केला जाईल तेव्हाच आपले देशावरचे प्रेम सिद्ध होईल. त्यामुळे, देशावर प्रेम करण्यासाठी स्वार्थ सोडावाच लागेल असे लेखक या वाक्यातून सुचवू पाहत आहेत.

## परिच्छेद ४

### कृती १ – आकलन

**१. आकृती पूर्ण करा.**

**याकरिता संकटांना निमंत्रण देण्याची गरज नसते**

→ ☐ → ☐

**उत्तर:** १. देशावरील प्रेम प्रकट करण्यासाठी
२. देशबांधवांवरील प्रेम प्रकट करण्यासाठी

**२. चौकटी पूर्ण करा.**

i. **देशावर प्रेम म्हणजेच यांच्यावरील प्रेम** → ☐
ii. **कधीही निष्क्रिय राहू न शकणारे** → ☐
iii. **प्रेमात असणारी शक्ती** → ☐
iv. **साने गुरुजींच्या कवितेचे नाव** → ☐

**उत्तर:** i. देशबांधवांवरील ii. प्रेम
iii. संवर्धक शक्ती iv. खरा धर्म

**३. कोण ते लिहा.**
i. देशावर प्रेम करण्याचा दावा फोल ठरणारे -
ii. 'माझ्या देशावर माझे प्रेम आहे' असे खऱ्या अर्थाने म्हणू शकणारे -

**उत्तर:** i. देशबांधवांवर प्रेम न करता येणारे
ii. खऱ्या धर्माचे उपासक

***४. खालील विचार कोणाचे आहेत ते लिहा.**

| विचार | व्यक्ती |
|---|---|
| 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे.' | ________ |

**उत्तर:** साने गुरुजी

**[एस.टी. च्या, रेल्वेच्या ......................**
**................................. माझे प्रेम आहे.']**

### कृती २ – आकलन

**१. तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | इच्छा | शक्य गोष्टी |
|---|---|---|
| i. | सारे विश्व प्रेमाने कवेत घ्यावेसे वाटले | ________ |
| ii. | यच्चयावत मानवमात्रांवर प्रेम करायचे म्हटले | ________ |

**उत्तर:** i. जवळचे त्यांनाच आलिंगन देता येते.
ii. देशबांधवांवर प्रेम करणेच शक्य असते.

**२. हे केव्हा घडेल ते लिहा.**
**गाड्या घाण राहणार नाहीत, जेव्हा .....**

**उत्तर:** एस.टी. च्या, रेल्वेच्या कामगारांमध्ये, प्रवाशांमध्ये आपल्या देशबांधवांबद्दल प्रेम, आस्था निर्माण होईल.

**३. का ते लिहा.**
**देशावरचे आपले प्रेम प्रत्येक बारीक सारीक गोष्टीत दिसून आले पाहिजे; कारण.....**

**उत्तर:** मोठ मोठे प्रश्न उभे राहतात तेव्हा तर आपण देशबांधवांवरील प्रेम दाखवतोच; मात्र असे मोठे प्रसंग जीवनात एखाद्या वेळीच आले तर येतात; पण छोटे छोटे प्रसंग मात्र रोजच येत असतात.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**१. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

**उत्तर:** आज सारे विश्व धर्म, पंथ, जात, भाषा यांच्या नावाखाली विभागले गेले आहेत; पण साने गुरुजींच्या मते मानवाचा एकच

Sample Content

खरा धर्म आहे, तो म्हणजे माणसावर प्रेम करणे. हा धर्म माणसामाणसांत भेदा-भेदाच्या भिंती उभारणारा नाही. खरा धर्म हा सारी बंधने, सारे भेद बाजूला सारून केवळ प्रेम करत माणसांना जवळ आणणारा आहे. या धर्मात कुणी उच्च-नीच नाही. सारे समान आहेत. प्रत्येक मानवाने इतर मानवांचा मानवतेने विचार करणे, सुख-दु:खात एकमेकांची साथ देणे, परस्परांना प्रेमाने वागवणे, दु:खी माणसांचे अश्रू पुसून त्यांना प्रेमाने आनंद देऊ करणे हे या धर्मात अपेक्षित आहे. हा धर्म माणसात रुजला, तर सारे विश्व आनंदाने नांदू लागेल.

## परिच्छेद ५

### कृती १ – आकलन

**१. आकृत्या पूर्ण करा.**

i. **आपले देशावर प्रेम असते तर ही परिस्थिती दिसली नसती**

→ ☐ ☐

**उत्तर:** १. आपली गावे मलमूत्राने वेढलेली नसती
२. आपले डोंगर उघडेबोडके दिसले नसते

ii. **अशा भूमीला सुफला म्हणता येणार नाही ज्यात**

→ ☐ ☐

**उत्तर:** १. कष्ट करणाऱ्याला फळ मिळत नाही
२. फळाची इच्छा धरणाऱ्याला कष्ट करावे लागत नाहीत

iii. **यांचे निमित्त करून आपसांत भांडलेले भारतमातेला रुचणार नाही**

→ ☐ ☐ ☐ ☐

**उत्तर:** १. जात २. धर्म
३. वंश ४. भाषा

iv. **देशावरील प्रेम सिद्ध करण्यासाठी आपल्याला समाजघटकांना यांची हमी देता आली पाहिजे**

→ ☐ ☐ ☐ ☐

**उत्तर:** १. न्याय २. स्वातंत्र्य
३. समता ४. आपलेपणा

**२. चौकटी पूर्ण करा.**

i. **भूमीला असे बनवण्यासाठी घाम गाळायची तयारी ठेवली पाहिजे** → ☐

ii. **आपली भूमी अशी आहे** → ☐

iii. **आपल्या कर्तृत्वावर अवलंबून असलेली गोष्ट** → ☐

**उत्तर:** i. सस्यश्यामल ii. सुजलाम सुफलाम
iii. भूमीची सुफलता

**[खरोखरच आपल्या देशावर ......................**
**.................................. देशावर प्रेम करणे.]**

### कृती २ – आकलन

**१. योग्य विधान लिहा.**

अ. देशातील हवा, पाणी, निसर्ग बिघडून टाकल्यामुळे आपल्या देशावरील आपले प्रेम सिद्ध होईल.
ब. 'वंदे मातरम्' गीतातील आदर्श वास्तवात येण्यासाठी धडपडण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे.
क. भूमिपुत्रावर ज्यांना प्रेम करता येत नाही त्यांचे भूमीवर प्रेम करणे सहज शक्य होईल.
ड. देशावर प्रेम करणे म्हणजे भूमीवर प्रेम आणि भूमिपुत्रांचा द्वेष करणे होय.

**उत्तर:** 'वंदे मातरम्' गीतातील आदर्श वास्तवात येण्यासाठी धडपडण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे.

***२. परिच्छेदाच्या आधारे थोडक्यात स्पष्ट करा.**
**सस्यश्यामला माता**

**उत्तर:** भारताचे गौरव असलेल्या राष्ट्रगीतामध्ये भारतभूमीला 'सस्यश्यामला माता' असे म्हटले आहे. या शब्दांचा अर्थ बहरलेल्या पिकांनी समृद्ध झालेली, साऱ्या भारतीयांचे पालनपोषण करणारी माता असा होतो. सस्य म्हणजे धान्य, पीक होय. हे धान्य जेव्हा परिपक्व होते तेव्हा ते काहीसा गडद रंग दर्शवू लागते. हा काळासावळा, रंग समृद्धीची चाहूल घेऊन येतो. अशी समृद्धी धारण करणारी माता म्हणजेच आपली भारतभूमी सस्यश्यामल माता होय. या मातेचे भूमिपुत्र म्हणून तिची ही समृद्धता टिकवून ठेवणे हे भारताच्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. ही हिरवळ, ही समृद्धी राखण्यासाठी कष्ट करणे, प्रयत्नशील राहणे हा देशप्रेमाचाच एक भाग आहे.

### कृती ३ – स्वमत/अभिव्यक्ती

**१. तुमचे देशावरील प्रेम सिद्ध करण्यासाठी या देशाचा नागरिक म्हणून तुम्ही काय कराल?**

**उत्तर:** देशाचा नागरिक म्हणून माझी सर्व कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडण्याचा मी प्रयत्न करेन. राहतो त्या परिसराची स्वच्छता

Sample Content

करणे, निसर्गसंवर्धनास हातभार लावणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, व्यवहारात प्रामाणिक राहणे इत्यादी कर्तव्ये मी पूर्ण करेन. कोणताही भेदाभेद न मानता माणूस म्हणून माणसांशी प्रेमाने वात्सल्याने वागेन. साऱ्या भूमिपुत्रांना आपले मानेन. स्वार्थाचा त्याग करून गरजूंची सेवा करेन. देश संरक्षणाकरिता सतत दक्ष राहीन. १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मतदानाचा हक्क आवर्जून बजावेन. आपल्या देशाविषयी व देशवासियांविषयी प्रेम आणि आस्था बाळगेन. इंधनांचा, पाण्याचा, विजेचा जपून वापर करेन. प्लॅस्टिकसारख्या गोष्टीचा वापर करणे टाळेन. मी भ्रष्टाचारास प्रोत्साहन देणार नाही, अशारीतीने, देशाचा नागरिक म्हणून मी देशसेवेसाठी नेहमी तत्पर राहीन.

## पाठाधारित कृती

***१. पाठाच्या आधारे थोडक्यात स्पष्ट करा.**
**प्रतिज्ञा**

**उत्तर:** प्रस्तुत पाठ म्हणजे लेखकांनी पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञेच्या तिसऱ्या वाक्याचा आशय उलगडण्याचा केलेला प्रयत्न होय. प्रतिज्ञा म्हणजे केवळ काही वाक्यांचा संच नसून प्रतिज्ञा म्हणजे काया, वाचा, मनाने केलेला एक संकल्प असतो. प्रतिज्ञेतील प्रत्येक शब्द हा मनात स्फुरण चढवणारा असतो; कारण या प्रत्येक शब्दामागे संकल्पांचे बळ असते. आपण जे प्रतिज्ञेद्वारे बोलत आहोत तेच आपल्याला साध्य करायचे आहे असा दृढ विश्वास या शब्दांमागे दडलेला असतो. त्याकरिता आपण सवयीने बोलत असलेल्या या प्रतिज्ञेतील प्रत्येक शब्दाचा खरा अर्थ जाणून घेतल्यास त्या शब्दांना आपल्याला न्याय देता येतो. प्रतिज्ञा व तिच्यासोबत येणाऱ्या जबाबदाऱ्या, कर्तव्य यांची जाण प्रत्येकाला असणे गरजेचे असते.

***२. खालील आकृती पूर्ण करा.**

**देशावरील प्रेम सिद्ध होण्यासाठी लेखकाने पाठात सांगितलेल्या विविध कृती**

**उत्तर:**

१. देशाच्या नवनिर्माणासाठी रचनात्मक कार्य करणे
२. हातात झाडू घेऊन गावाची शास्त्रीय पद्धतीने साफसफाई करणे
३. कोणतेही काम करताना याचा आपल्या देशावर व देशवासियांवर काय परिणाम होईल याचा विचार करणे
४. आपल्या पोटापलीकडे जाऊन पाहणे
५. खऱ्या धर्माचा उपासक बनणे
६. भूमी सस्यश्यामल व्हावी म्हणून घाम गाळायची तयारी ठेवणे
७. देश प्रदूषणाच्या कचाट्यात गवसू नये यासाठी खटपट करणे
८. देशाचे आजचे चित्र बदलण्यासाठी कंबर कसणे
९. 'वंदे मातरम्' गीतात जो आदर्श सांगितला आहे तो वास्तवात यावा, यासाठी धडपडणे
१०. सर्व समाजघटकांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणाची हमी आपल्याला देता येणे

**(टीप:** विद्यार्थ्यांनी वरीलपैकी कोणतीही चार उत्तरे लिहावीत.)

***३. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**
**प्रतिज्ञेतील एखादया शब्दाचा अर्थ जाणून घेताना व कृतीत आणतानाचा तुमचा अनुभव लिहा.**

**उत्तर:** आपल्या प्रतिज्ञेतील 'भारत माझा देश आहे' या पहिल्याच वाक्याचा अर्थ गुरुजींनी उलगडून सांगितला आणि या वाक्यातील 'माझा' या शब्दाचा मला नव्याने अर्थ उमगला. माझा माझ्या देशाकडे, आजूबाजूच्या परिसराकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. त्या दिवशी शाळेतून घरी जाताना आमच्या इमारतीबाहेरील कचराकुंडीच्या आजूबाजूला पडलेला कचरा माझ्या निदर्शनास आला. लोकांनी कचरा कचराकुंडीत टाकण्याऐवजी बाहेर टाकलेला दिसला. माझ्या परिसरातील स्वच्छतेची जबाबदारी माझी असली पाहिजे या विचाराने घरी जाऊन नाकाला मास्क लावून, हातमोजे घालून मी परतलो आणि झाडूने सर्व कचरा एकत्र केला. आजूबाजूचे लोक माझ्याकडे पाहून चर्चा करू लागले; पण मी मात्र त्यांच्याकडे लक्ष न देता सगळा कचरा कचरापेटीत जमा केला. माझी ही कृती पाहण्यासाठी परिसरातील बरीच मंडळी जमली होती. त्यांना त्यांची चूक कळाली होती. त्यानंतर मात्र मला कधीही कचरा कचराकुंडीच्या बाहेर दिसला नाही. देश माझा आहे हे प्रत्येकाने स्विकारले, तर देशाची प्रगती निश्चितच होईल, असा विश्वास मला या अनुभवाने मिळवून दिला.

## भाषाभ्यास विभाग

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

***१. गटात न बसणारा शब्द ओळखा व तो शब्द गटात का बसत नाही यामागील कारण सांगा.**

i. मी, आपण, रत्ना, त्यांचे
ii. राहणे, वाचणे, गाणे, आम्ही
iii. तो, हा, सुंदर, आपण
iv. भव्य, सुंदर, विलोभनीय, करणे

**उत्तर:**
i. रत्ना - हे नाम असून इतर सर्व सर्वनामे आहेत.
ii. आम्ही - हे सर्वनाम असून इतर सर्व क्रियापदे आहेत.
iii. सुंदर - हे विशेषण असून इतर सर्व सर्वनामे आहेत.
iv. करणे - हे क्रियापद असून इतर सर्व विशेषणे आहेत.

Sample Content

*२. **वाचा व उत्तरे लिहा.**
**प्रमुख विद्यार्थी क्रमांक बक्षीस प्रथम पाहुणे दिले.**

i. वरील शब्दसमूह वाक्य आहे काय? ☐
ii. वरील शब्दसमूहातून अर्थबोध होतो का? ☐
iii. अर्थबोध होण्यासाठी वाक्य कसे लिहावे लागेल ते लिहा.

**उत्तर:** i. नाही. ii. नाही.
iii. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्याला प्रथम क्रमांकाचे बक्षीस दिले.

*३. **खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

i. गगनभेदी घोष करणे ii. रचनात्मक काम करणे
iii. पोटापलीकडे पाहणे iv. कचाट्यात सापडणे

**उत्तर:**

i. सचिनने मैदानात पाऊल टाकताच साऱ्यांनीच **गगनभेदी घोष केला.**
ii. जेष्ठ समाजसेवक भाऊंनी समाजासाठी **रचनात्मक काम केले.**
iii. खरा देशभक्त देशहितासाठी **पोटापलीकडे पाहतो.**
iv. जंगलात रस्ता चुकलेली गाय सिंहाच्या **कचाट्यात सापडली.**

४. **खालील शब्दांचे मूळ शब्द व सामान्यरूप ओळखून लिहा.**

i. शाळेत ii. लोकांनी
iii. काळात iv. देशाच्या

**उत्तर:**

| क्र. | शब्द | मूळ शब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| i. | शाळेत | **शाळा** | **शाळे** |
| ii. | लोकांनी | **लोक** | **लोकां** |
| iii. | काळात | **काळ** | **काळा** |
| iv. | देशाच्या | **देश** | **देशा** |

५. **खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.**
**(विधानार्थी / प्रश्नार्थी / उद्गारार्थी / आज्ञार्थी)**

i. हो, हो, करते तर!
ii. देशावर प्रेम करायचे, तर तुम्ही काय कराल?
iii. मुलांनो, शांतपणे ऐका.
iv. प्रेमात अपार संवर्धक शक्ती असते.

**उत्तर:** i. उद्गारार्थी वाक्य ii. प्रश्नार्थी वाक्य
iii. आज्ञार्थी वाक्य iv. विधानार्थी वाक्य

६. **खालील वाक्यांतील काळ ओळखा.**

i. मी शाळेत गेलो होतो.
ii. आमचे आमच्या देशावर प्रेम आहे.
iii. मी माझ्या देशाचा गौरव वाढवेन.
iv. तो नेता निवडणुकीच्या दौऱ्यासाठी येत आहे.

**उत्तर:** i. पूर्ण भूतकाळ ii. साधा वर्तमानकाळ
iii. साधा भविष्यकाळ iv. अपूर्ण वर्तमानकाळ

७. **खालील वाक्यांतील प्रयोग ओळखून लिहा.**

i. कोंबडा आरवतो. ii. आईने भाकऱ्या थापल्या.
iii. कावळे प्रार्थना म्हणतात. iv. मला आज मळमळते.

**उत्तर:** i. कर्तरी प्रयोग ii. कर्मणी प्रयोग
iii. कर्तरी प्रयोग iv. भावे प्रयोग

८. **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i. संकटांना आमंत्रण देणे ii. प्रकट करणे
iii. कवेत घेणे iv. आलिंगन देणे
v. घाम गाळणे vi. कंबर कसणे
vii. खटपट करणे viii. फळ मिळणे
ix. शब्दांकित करणे x. आश्वासन देणे

**उत्तर:**

**i. संकटांना आमंत्रण देणे** – संकट स्वत:वर ओढवून घेणे.
**वाक्य:** व्यसने करून लोक उगाच **संकटांना आमंत्रण देतात.**

**ii. प्रकट करणे** – व्यक्त करणे.
**वाक्य:** विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून रमाने शिस्तीविषयी आपले मत **प्रकट केले.**

**iii. कवेत घेणे** – कुशीत घेणे.
**वाक्य:** छोटी मीना रडू लागताच आईने तिला **कवेत घेतले.**

**iv. आलिंगन देणे** – मिठी मारणे, गळाभेट घेणे.
**वाक्य:** खूप दिवसांनी चारुला पाहताच प्रियाने तिला **आलिंगन दिले.**

**v. घाम गाळणे** – कष्ट करणे, मेहनत करणे.
**वाक्य:** राघोबाने शेतात खूप **घाम गाळला.**

**vi. कंबर कसणे** – काम करायला तयार होणे.
**वाक्य:** दहावीच्या परीक्षेकरिता विजयने **कंबर कसली.**

**vii. खटपट करणे** – प्रयत्न करणे.
**वाक्य:** नोकरीसाठी राजनने खूप **खटपट केली.**

**viii. फळ मिळणे** – यश मिळणे.
**वाक्य:** मुलगी पोलीस झाली आणि रमाकाकूंना त्यांच्या मेहनतीचे **फळ मिळाले.**

**ix. शब्दांकित करणे** – शब्दांत व्यक्त करणे.
**वाक्य:** रघूला आपल्या आईविषयीचे भाव **शब्दांकित करता आले नाही.**

**x. आश्वासन देणे** – हमी देणे, खात्री देणे.
**वाक्य:** सरपंचांनी शाळादुरुस्ती करण्याचे **आश्वासन दिले.**

Sample Content

## आ. भाषिक घटकांवर आधारित कृती

*१. **समान अर्थाचे जोडशब्द तयार करा.**
**उदा. पालनपोषण**

i. दंगा ii. कोड iii. थट्टा
iv. धन v. बाजार

**उत्तर:** i. दंगा**मस्ती** ii. कोड**कौतुक**
iii. थट्टा**मस्करी** iv. धन**दौलत**
v. बाजार**हाट**

*२. **खाली दिलेल्या शब्दांचे तक्त्यात वर्गीकरण करा.**
**गाव, गावे, देश, काम, शेला, सणंग, मुलगा, मूल, मुले, आई, यंत्र, रेल्वे, विश्व, शक्ती, भूमी, चित्र, हवा, पाणी, निसर्ग, गीत, भाषा.**

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| | | |

**उत्तर:**

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|
| देश, शेला, मुलगा, निसर्ग. | गावे, मुले, आई, रेल्वे, शक्ती, भूमी, हवा, भाषा. | गाव, काम, सणंग, मूल, यंत्र, विश्व, चित्र, पाणी, गीत. |

३. **खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. प्रार्थना ii. भूमी iii. भेद
iv. सक्रिय v. सज्ञान vi. पोट

**उत्तर:** i. अर्चना, आराधना ii. धरती
iii. फरक iv. क्रियाशील
v. सुज्ञ vi. उदर

४. **खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. दुर्दैवी × ii. गुलाम × iii. भेद ×
iv. निष्क्रिय × v. सुबुद्ध × vi. स्वार्थी ×
vii. न्याय ×

**उत्तर:** i. सुदैवी ii. मालक
iii. साम्य iv. सक्रिय
v. निर्बुद्ध, दुर्बुद्ध vi. नि:स्वार्थी
vii. अन्याय

५. **खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. मी विचारले तुम्ही देशावर प्रेम करता म्हणजे काय करता
ii. संत कबिरांचे नाव तुम्ही ऐकले आहे ना
iii. मुले शांतपणे ऐकत होती
iv. सर्व भूमिपुत्रांना न्याय स्वातंत्र्य समता आणि आपलेपणा यांचे आश्वासन देणे म्हणजेच देशावर प्रेम करणे

**उत्तर:**

i. मी विचारले, "तुम्ही देशावर प्रेम करता म्हणजे काय करता?"
ii. संत कबिरांचे नाव तुम्ही ऐकले आहे ना?
iii. मुले शांतपणे ऐकत होती.
iv. सर्व भूमिपुत्रांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि आपलेपणा यांचे आश्वासन देणे, म्हणजेच देशावर प्रेम करणे.

## आकारिक मूल्यमापन

### चर्चा करूया.

*१. **शाळेसंबंधी विद्यार्थ्यांची कर्तव्ये कोणती, याविषयी मित्रमैत्रिणींशी चर्चा करा.**

*२. **संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून चर्चा करा. त्याचा तुम्हांला कळलेला अर्थ वर्गात सांगा.**

(**टीप:** 'चर्चा करूया' मधील कृतींच्या उत्तराकरिता शेजारील **Q. R. Code** स्कॅन करावा.)

### माझे वाचन

*१. **'प्रतिज्ञा' हे यदुनाथ थत्ते यांचे पुस्तक मिळवा व त्याचे वाचन करा.**
(**टीप:** वरील कृती विद्यार्थ्यांनी स्वत: करावी.)

*२. **या पाठ्यपुस्तकातील 'जलदिंडी' हा पाठ वाचा व त्याचा या पाठाशी संबंध कसा जोडता येईल ते सांगा.**
(**टीप:** वरील कृती विद्यार्थ्यांनी स्वत: करावी.)

### उपक्रम

*१. **आपल्या कार्यातून देशावर आणि देशातील लोकांवर प्रेम करणाऱ्या तुमच्या परिसरातील पाच व्यक्तींची माहिती मिळवा. ती माहिती लिहून काढा व वर्गात वाचून दाखवा.**
(**टीप:** वरील उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वत: करावा.)

Sample Content

Page no. **11** to **144** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# व्याकरण विभाग

## १. सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय

वाक्य हे शब्दांचे बनलेले असते. वाक्यात जे शब्द वापरले जातात ते जसेच्या तसे वापरता येत नाहीत. वाक्यात वापरताना त्यांच्या मूळ स्वरूपात काही बदल करावा लागतो.

**उदा.** मी घर जाते. ×  मी घरी जाते. ✓

वरीलपैकी पहिले वाक्य चुकीचे, तर दुसरे वाक्य बरोबर आहे. पहिल्या वाक्यात मूळ शब्द जसाच्या तसा आला आहे, जो वाक्याचा सुसंघटित अर्थ सांगू शकत नाही. याउलट, दुसऱ्या वाक्यात 'घर' या मूळ शब्दाला 'ई' हा प्रत्यय लागला आहे. ज्यामुळे वाक्याचा अर्थ सहजपणे उलगडला जातो.

शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दात जो बदल घडतो, त्या बदलाला शब्दाचे **'सामान्यरूप'** म्हणतात आणि शब्दाच्या मूळ रूपाला **'सरळरूप'** म्हणतात.

उदाहरणार्थ, कल्पनाने कपात चहा ओतला.

वरील वाक्यात 'कप~कपा' हा बदल झालेला आहे. येथे 'कप' हे सरळरूप, तर 'कपा' हे सामान्यरूप आहे.

**नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखवले जातात, त्या विकारांना 'विभक्ती' असे म्हणतात.**

**विभक्तीची वैशिष्ट्ये**

- नाम व सर्वनामांना प्रत्यय लागून विभक्तीची रूपे तयार होतात.
- ही रूपे क्रियापद व इतर शब्द यांच्यातील संबंधांशी निगडित असतात.

**लक्षात ठेवा.**

१. नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यासाठी जी अक्षरे जोडली जातात, त्यांना '**प्रत्यय**' असे म्हणतात.

२. विभक्तीचे प्रत्यय लागण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या मूळ रूपात जो बदल होतो, त्याला '**सामान्यरूप**' म्हणतात.

### विभक्तीचे प्रत्यय

**खालील तक्ता वाचा. 'घर' या नामाची विभक्तीची रूपे पाहा.**

| विभक्ती | एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यय | शब्दांची रूपे | प्रत्यय | शब्दांची रूपे |
| **प्रथमा** | - | घर | - | घरे |
| **द्वितीया** | स,ला,ते | घरास, घराला | स, ला, ना, ते | घरांस, घरांना |
| **तृतीया** | ने, ए, शी | घराने, घराशी | नी, शी, ई, ही | घरांनी, घरांशी |
| **चतुर्थी** | स,ला,ते | घरास, घराला | स, ला, ना, ते | घरांस, घरांना |
| **पंचमी** | ऊन, हून | घराहून | ऊन, हून | घरांहून |
| **षष्ठी** | चा, ची,चे | घराचा, घराची, घराचे | चे, च्या, ची | घरांचे, घरांच्या, घरांची |
| **सप्तमी** | त, ई, आ | घरात | त, ई, आ | घरांत |
| **संबोधन** | - | घरा | नो | घरांनो |

Sample Content

**लक्षात ठेवा.**

१. प्रथमा विभक्तीला प्रत्यय नसतो.
२. यांतील काही प्रत्ययांचा उपयोग केवळ पद्यात होतो.
उदा., चतुर्थी एकवचन 'ते', सप्तमी एकवचन 'आ'.
३. अनेकवचनी प्रत्यय लावताना प्रत्ययापूर्वीच्या अक्षरावर अनुस्वार येतो.
४. नामाप्रमाणे सर्वनामांनाही प्रत्यय लावून रूपे तयार होतात.

**खालील तक्ता अभ्यासा.**

| शब्द | मूळ शब्द | सामान्यरूप | प्रत्यय | विभक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| साताऱ्याहून | सातारा | साताऱ्या | हून | पंचमी |
| सौंदर्याचा | सौंदर्य | सौंदर्या | चा | षष्ठी |
| स्वारांनी | स्वार | स्वारां | नी | तृतीया |
| पोटात | पोट | पोटा | त | सप्तमी |

**लक्षात ठेवा.**

१. काही वेळा शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाच्या मूळ रूपात बदल होत नाही.
उदा. ईकारान्त स्त्रीलिंगी नामे.
खिडकी – खिडकीला, खिडकीत
खोली – खोलीत, खोलीची

२. सामान्यरूपातला शब्द व त्याचे प्रत्यय जोडूनच लिहायचे असतात.
उदा. मीना ने पेला ला हात लावला. ×
मीनाने पेल्याला हात लावला. ✓

३. विशेषनामांना प्रत्यय लावताना त्यांचे सामान्यरूप होत नाही, म्हणजेच त्यांच्या मूळ रूपात बदल होत नाही.
उदा. अंजलीला, सुजाताला, रवीला

४. पौराणिक पात्रांची नावे सामान्यरूपात लिहितात.
उदा. रामाने, सीतेने, कृष्णाला
परंतु, हीच नावे आताच्या जगातील व्यक्तींची असतील, तर त्यांचे सहसा सामान्यरूप होत नाही.
उदा. रामने, दशरथने इत्यादी.

५. आडनावांचे सामान्यरूप होते. उदा. फडक्यांना, मोऱ्यांना, पाटलांना इत्यादी; पण लिहिताना सामान्यरूप न वापरता, 'फडके यांना', 'मोरे यांना', 'पाटील यांना' असे लिहितात.

६. गावांच्या, राज्यांच्या नावांचेही सामान्यरूप होते.
उदा. पुणे – पुण्याला, गोवा – गोव्याला

**सरावासाठी कृती**

**१. खालील तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | मूळ शब्द | सामान्य रूप | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| मुंबईहून | | | | |
| पुस्तकाचे | | | | |
| गावात | | | | |
| कानाला | | | | |
| छत | | | | |
| विद्यार्थ्यांनो | | | | |

**उत्तर:**

| शब्द | मूळ शब्द | सामान्य रूप | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| मुंबईहून | मुंबई | मुंबई | हून | पंचमी |
| पुस्तकाचे | पुस्तक | पुस्तका | चे | षष्ठी |
| गावात | गाव | गावा | त | सप्तमी |
| कानाला | कान | काना | ला | द्वितीया, चतुर्थी |
| छत | छत | छत | - | प्रथमा |
| विद्यार्थ्यांनो | विद्यार्थी | विद्यार्थ्यां | नो | संबोधन |

**२. खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिहा.**

i. ________ (कागद) फाटला.
ii. नीना आता ________ (आई) भांडली.
iii. ________ (सिंह) गर्जना केली.
iv. तिने ________ (स्वत:) कार्यक्रमात सहभाग घेतला.
v. मी ________ (मोती) आंघोळ घातली.
vi. ________ (कैरी) लोणचे छान मुरले आहे.

**उत्तर:** i. **कागद** फाटला.
ii. नीना आता **आईशी** भांडली.
iii. **सिंहाने** गर्जना केली.
iv. तिने **स्वत:हून** कार्यक्रमात सहभाग घेतला.
v. मी **मोतीला** आंघोळ घातली.
vi. **कैरीचे** लोणचे छान मुरले आहे.

Sample Content

# २. प्रयोग

वाक्य म्हणजे पूर्ण विधान करणारा एक किंवा अनेक शब्दांचा समूह आहे. वाक्यातील 'क्रियापद' हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. क्रियापदाने दाखवलेली क्रिया करणारा जो असतो, त्याला 'कर्ता' म्हणतात. वाक्यात दाखवलेली क्रिया काही वेळा कर्त्याशीच न थांबता पुढे जाते व ती ज्याच्यावर घडते, त्याला 'कर्म' म्हणतात. कर्ता, कर्म व क्रियापद हे वाक्यातील महत्त्वाचे घटक असतात.

**लक्षात ठेवा.**

- वाक्यात कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य दिल्यामुळे क्रियापदाचे रूप त्यांच्याप्रमाणे बदलत असते. वाक्यातील कर्ता ↔ क्रियापद, कर्म ↔ क्रियापद या संबंधाला **'प्रयोग'** असे म्हणतात. थोडक्यात, कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी जी जुळणी किंवा रचना असते, तिला व्याकरणात **'प्रयोग'** म्हणतात.
- कर्ता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळ धातू शोधावा व त्याला '- णारा' प्रत्यय लावून 'कोण?' असा प्रश्न करावा, म्हणजे कर्ता मिळतो. उदा. गाय चारा खाते. या वाक्यातील 'खा' हा धातू व त्याला 'णारी' लावून 'खाणारी कोण?' तर 'गाय' हे उत्तर मिळते. म्हणजेच कर्ता गाय आहे.
- वाक्यातील क्रियापदाने दाखवलेली क्रिया कर्त्यापासून निघते व ती दुसऱ्या कोणावर किंवा कशावर तरी घडते, त्या क्रियेचा परिणाम ज्याच्यावर घडतो ते त्या क्रियेचे कर्म आहे असे समजावे.

**प्रयोगाचे मुख्य प्रकार: तीन**

**१. कर्तरी प्रयोग** | **२. कर्मणी प्रयोग** | **३. भावे प्रयोग**

## १. कर्तरी प्रयोग

**जेव्हा वाक्यातील क्रियापद हे कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष याप्रमाणे बदलते तेव्हा तो 'कर्तरी' प्रयोग असतो.**

**कर्तरी प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता प्रथमा विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास ते प्रथमा किंवा द्वितीया विभक्तीत असते.
- वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुष यांनुसार बदलते.

## २. कर्मणी प्रयोग

**जेव्हा वाक्यातील क्रियापद हे कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलते तेव्हा तो 'कर्मणी' प्रयोग असतो.**

**कर्मणी प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता सामान्यतः तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म नेहमी प्रथमा विभक्तीत असते.
- क्रियापद कर्माच्या लिंग, वचनानुसार बदलते.

## ३. भावे प्रयोग

**जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी व स्वतंत्र असते, तेव्हा तो 'भावे' प्रयोग असतो.**

**भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता सामान्यतः तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास द्वितीया विभक्तीत असते.
- क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असते व कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनानुसार ते बदलत नाही.

## सरावासाठी कृती

**१. कंसातील क्रियापदाचे रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

i. कमलेश चित्र ________ (रंगवणे)
ii. कविता चित्र ________ (रंगवणे)
iii. आम्ही चित्र ________ (रंगवणे)
iv. तुम्ही चित्र ________ (रंगवणे)
v. दीदी चित्र ________ (रंगवणे)
vi. रोहित चित्र ________ (रंगवणे)

**उत्तर:** i. कमलेश चित्र **रंगवतो.**
ii. कविता चित्र **रंगवते.**
iii. आम्ही चित्र **रंगवतो.**
iv. तुम्ही चित्र **रंगवता.**
v. दीदी चित्र **रंगवते.**
vi. रोहित चित्र **रंगवतो.**

**२. खालील वाक्यांतील प्रयोग ओळखून लिहा.**

i. मला पत्ता सापडला.
ii. त्यांनी त्याला देव मानले.
iii. सचिनने चेंडू फेकून मारला.

Sample Content

Page no. **148** to **170** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes**

Sample Content

# १ पत्रलेखन

पत्रलेखन ही एक कला आहे. एका व्यक्तीचे विचार/भावना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे हे एक महत्त्वाचे आणि उत्तम साधन आहे. विषय आणि स्वरूपानुसार पत्रलेखनाचे दोन प्रमुख प्रकार पडतात.

१. औपचारिक पत्र – हे पत्र कार्यालयीन स्वरूपाचे पत्र असते. यात विनंती पत्र, मागणी पत्र, तक्रार पत्र अशा पत्रांचा समावेश असतो.

२. अनौपचारिक पत्र – हे पत्र घरातील, नात्यातील जवळच्या व्यक्तींना लिहिले जाते.

आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे माहिती आणि विचारांची देवाणघेवाण यासाठी अनेक साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे, पत्र लिहिण्याचे प्रमाण आज कमी झाले आहे. तरीदेखील अर्ज करणे, विनंती करणे, मागणी करणे अशा कामांसाठी कार्यालयीन पत्रव्यवहार करताना औपचारिक स्वरूपातील पत्र लिहावी लागतात. ही पत्र व्यक्तिगत किंवा सार्वजनिक स्तरावर लिहिली जातात. या वर्षी तुम्ही औपचारिक पत्रलेखनातील विनंती पत्र कसे लिहावे, हे शिकणार आहात.

**औपचारिक पत्रलेखनासाठी महत्वाच्या गोष्टी:**

१. ज्या व्यक्तीला पत्र लिहायचे आहे तिचा उल्लेख योग्य पदासह आणि आदरपूर्वक करावा.
२. पत्रलेखनाची भाषा सुस्पष्ट, नेमकी आणि विषयानुरूप असावी.
३. संपूर्ण पत्र मुख्य विषयाला धरूनच लिहावे.
४. पत्र लिहिताना लेखननियमांचा काटेकोरपणे वापर करावा.
५. पत्र ज्यांना पाठवायचे आहे त्यांचे पद, शिक्षण, वय, योग्यता आदी बाबी लक्षात घेऊन पत्रात सुयोग्य भाषा वापरावी.

**औपचारिक पत्रातील मुख्य घटक:**

१. ज्यांना पत्र पाठवायचे त्यांचा पत्ता व दिनांक.
२. मायना व विषय
३. मुख्य मजकूर
४. समारोप

(**टीप:** नवीन ई मेल प्रारूपानुसार पत्रलेखन करावे.)

**औपचारिक पत्राचे प्रारूप**

दिनांक:
प्रति,
माननीय ________ ,
(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय: ______________________ (पत्राचे कारण)

महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,
पत्र पाठवणाऱ्याची सही व नाव
पत्ता व इ-मेल

Sample Content

## औपचारिक पत्रे

***१. वरील प्रारूपाचा अभ्यास करून खालील विषयावर पत्रलेखन करा.**
**तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.**

**उत्तर:** दिनांक: १५ मे, २०२२.

प्रति,
माननीय किरण सावे सर,
वर्गशिक्षक,
महात्मा गांधी विद्यालय,
तळेगाव, नांदेड xxxxxx.

**विषय:** 'हस्ताक्षर सुंदर करूया!' शिबिरात सहभागी करून घेण्यासाठी.

महोदय,

मी, कु. कुशल विजय सावंत, इयत्ता आठवी 'अ' चा विद्यार्थी आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या शाळेने दिनांक २० मे २०२२ ते ३० मे २०२२ या दहा दिवसांत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' या शिबिराचे आयोजन केले आहे. त्यात सहभागी होण्याची माझी खूप इच्छा आहे; कारण या शिबिरात प्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव सर मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्याकडून हस्ताक्षर सुंदर करण्याची कला शिकून घेणं म्हणजे एक सुवर्णसंधीच आहे. ही सुवर्णसंधी मला लाभावी. शिबीर सुरू व्हायला फक्त चार दिवस बाकी आहेत. प्रवेशाच्या जागाही कमी आहेत.

कृपया, मला या शिबिरात सहभागी होण्याची संधी आपण द्यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
कु. कुशल विजय सावंत

कु. कुशल विजय सावंत
४०५, रत्नधाम,
वडेगाव, शिरीषकुमार रोड,
नांदेड xxxxxx
इ-मेल: abc@xyz.com

**२. तुमच्या शाळेमध्ये दिवाळीच्या सुट्टीत 'नाट्यदर्पण' संस्थेने १५ दिवसांची अभिनय कार्यशाळा आयोजित केली आहे. त्यात सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.**

**उत्तर:** दिनांक: १० नोव्हेंबर, २०२२.
प्रति,
माननीय संतोष राणे सर,
वर्गशिक्षक,
शैलेंद्र विद्यालय,
दहिसर (पूर्व),
मुंबई xxxxxx.

**विषय:** 'नाट्यदर्पण' संस्थेच्या अभिनय कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी.

महोदय,

मी कु. तारा रवी साने, इयत्ता आठवी 'अ' ची विद्यार्थिनी आपणांस सदर पत्र लिहीत आहे. आपल्या शाळेत येत्या दिवाळी सुट्टीत – दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या काळात 'नाट्यदर्पण' संस्थेने अभिनय कार्यशाळा आयोजित केली आहे. त्या कार्यशाळेत सहभागी होण्याची माझी खूप इच्छा आहे.



Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Mathematics
- My English Book
- मराठी बालभारती

## AVAILABLE BOOKS FOR STD. IX:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

### NOTES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

### WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

### ADDITIONAL TITLES
Grammar & Writing Skills Books
(Std. VIII, IX & X)
- Marathi
- Hindi
- English

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

**Visit Our Website**


Marketed by:

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
B2, 9th Floor, Asher, Road No. 16Z, Wagle
Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org





Explore
our range of
STATIONERY